**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी कॅनडामध्ये कनानास्किस इथं होणाऱ्या G-7 शिखर परिषदेत सहभागी होणार

- पश्चिम आशियातल्या तणावाला इराण जबाबदार असल्याचा जी सेव्हन देशांचा दावा

- अमेरिकन नागरिकांनी तात्काळ इराणमधून बाहेर पडावं असे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांचे निर्देश / भारतीय नगरिकांच्या मदतीसाठी केंद्र सरकारचा विशेष नियंत्रण कक्ष

- देशाच्या दुर्गम आणि आदिवासी भागात केंद्र सरकार २ हजार वाहन चालक प्रशिक्षण केंद्र सुरू करणार

**आणि**

- अमरनाथ यात्रेच्या सुरक्षेसाठी दोन्ही यात्रामार्ग नो फ्लाईंग झोन घोषित

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी कॅनडाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर असून, आज सकाळी ते कॅलगरी इथं पोहोचले. आज संध्याकाळी कॅनडामध्ये कनानास्किस इथं होणाऱ्या G-7 शिखर परिषदेत ते सहभागी होणार आहेत. ऊर्जा सुरक्षेचं भवितव्य, आणि बदलत्या जगात किफायतशीर दरात त्याची उपलब्धता, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि गुंतवणूक, या मुद्द्यांवर G-7 परिषदेत होणाऱ्या चर्चेत ते सहभागी होतील. G-7 परिषदेच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री, कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांच्यासह सदस्य देशांच्या इतर नेत्यांबरोबर द्विपक्षीय बैठका घेतील. प्रधानमंत्री मोदी सलग सहाव्यांदा G-7 परिषदेत सहभागी होत असून, त्यांचा गेल्या दहा वर्षांमधला कॅनडाचा हा पहिलाच दौरा आहे.

**<><><><>**

कॅनडाच्या दौऱ्यावर असलेले प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या क्रोएशियात राजधानी झाग्रेब इथं पोहचतील. या दौऱ्यामुळे मोदी हे क्रोएशियाला जाणारे पहिले भारतीय प्रधानमंत्री ठरतील. क्रोएशियातला भारतीय समुदायानं त्यांच्या स्वागताची तयारी केली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या भेटीमुळे क्रोएशियाचे भारताबरोबरचे संबंध अधिक दृढ होतील, असा विश्वास तिथल्या भारतीयांनी व्यक्त केला आहे.

**<><><><>**

पश्चिम आशियातल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, G7 देशांच्या नेत्यांनी आज इस्त्राएल आणि इराण दरम्यानच्या वाढत्या संघर्षाला संबोधित करणारं एक संयुक्त निवेदन जारी केलं. G7 च्या नेत्यांनी पश्चिम आशियातली शांतता आणि स्थैर्यासाठी वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार केला असून, इस्त्राएलच्या स्वसंरक्षणाच्या हक्काला पाठिंबा दर्शवला आहे. संघर्षमय परिस्थितीत नागरिकांचं संरक्षण महत्त्वाचं असल्याचं या निवेदनात म्हटलं आहे.

या प्रदेशात अस्थिरता आणि दहशतीचं वातावरण निर्माण करण्यासाठी  इराण जबाबदार असून, इराणनं अण्वस्त्रसज्ज होऊ नये, ही आपली भूमिका कायम असल्याचं G7 देशांनी म्हटलं  आहे.

**<><><><>**

इस्त्राईल आणि इराण यांच्यातला संघर्ष वाढत असून दोन्ही देश एकमेकांच्या पायाभूत सुविधा केंद्र आणि रहिवासी वस्त्यांवर हल्ले करत असल्याने संघर्षाची तीव्रता वाढत आहे. इस्त्राइलनं काल इराणची राष्ट्रीय प्रसारण सेवा संस्था इस्लामिक रिपब्लिक ऑफ ईराण ब्रॉडकास्टिंग, आयआरआयबीवर हल्ले केले. इस्त्राएलच्या पायाभूत सुविधा केंद्रांवर इराणनं केलेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून हे हल्ले केल्याचं इस्त्राएलच्या सैन्य अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. दरम्यान इराणनं इस्त्राइलबरोबरचा संघर्ष थांबवावा आणि अणु कार्यक्रमाच्या मुद्दयावर चर्चा करावी असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

दरम्यान,अमेरिकेच्या नागरिकांनी तात्काळ इराणमधून बाहेर पडावं असं त्यांनी सांगितलं आहे.

इस्त्राइलनं हवाई हल्ले थांबवावे याकरता अमेरिकेनं  हस्तक्षेप करावा असं आवाहन इराणनं केलं आहे. दरम्यान संयुक्त राष्ट्रांच्या अणु निरीक्षकांच्या प्रमुखांनी इराणच्या सर्वात मोठ्या युरेनियम समृद्धीकरण केंद्राचं मोठं नुकसान झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

**<><><><>**

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१७ जून २०२५ - मंगळवार

इराण आणि इस्रायलमधे सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र मंत्रालयाने परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी आणि भारतीय नागरिकांना मदत करण्यासाठी चोवीस तास सुरू असलेला एक नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. तसंच, मदतीसाठी संपर्क क्रमांकही दिले आहेत. ज्या भारतीय नागरिकांना मदतीची आवश्यकता असेल त्यांनी १८०० ११८ ७९७ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा असं आवाहन परराष्ट्र मंत्रालयाने केलं आहे. इराणमध्ये राहणाऱ्या किंवा प्रवास करणाऱ्या भारतीय नागरिकांसाठी भारतीय दुतावासाकडून आपत्कालीन हेल्पलाईन सक्रिय करण्यात आली आहे. त्याशिवाय cons.tehran@mea.gov.in या ईमेलद्वारे देखील नागरिकांना भारतीय दूतावासाशी संपर्क साधता येईल.

दरम्यान, भारतीय दूतावासानं तेहरान इथं शिकणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना शहराबाहेर स्थलांतरित केलं आहे. इतर भारतीय नागरिकांनीही शहराबाहेर स्थलांतरित व्हावं असं आवाहन परराष्ट्र मंत्रालयानं केलं आहे.

इस्रायलमध्ये तेल अविव इथल्या भारतीय दूतावासानंही इस्रायलमध्ये असणाऱ्या सर्व भारतीय नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. भारतीय नागरिकांनी सतर्क राहावं असं आवाहन दूतावासानं केलं आहे, तसंच नागरिकांच्या मदतीसाठी +९७२ ५४ ७५२०७११ आणि +९७२ ५४ ३२७८३९२ हे संपर्क क्रमांक देण्यात आले आहेत. त्याशिवाय cons1.telaviv@mea.gov.in या ईमेलवरही नागरिकांना संपर्क साधता येईल, असं परराष्ट्र मंत्रालयानं आपल्या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><>

केंद्र सरकारनं देशाच्या विविध भागात दोन हजार वाहन चालक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल नवी दिल्लीत एका कार्यक्रमात ही माहिती दिली. देशाच्या दुर्गम आणि आदिवासी भागात ही प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येतील, यामुळे तरुणांना आणखी एक कौशल्य आत्मसात करता येईल आणि रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असं गडकरी म्हणाले. देशात सध्या सुमारे २२ लाख वाहन चालकांची आवश्यकता आहे; आणि या प्रशिक्षण केंद्रांमधून कुशल वाहन चालक तयार होतील असं गडकरी यावेळी म्हणाले.

<><><><>

अमरनाथ यात्रेदरम्यान सुरक्षेचा उपाय म्हणून आजपासून जम्मू काश्मीर प्रशासनाने यात्रेचा मार्ग नो- फ्लाईंग झोन घोषित केला आहे. पहलगाम आणि बालताल या दोन्ही ठिकाणाहून जाणाऱ्या रस्त्यांना हा निर्णय लागू आहे. या मार्गावर यूएव्ही, ड्रोन किंवा तरंगते फुगे सोडण्यावर बंदी राहील. मात्र सुरक्षा यंत्रणाना या नियमातून सूट राहील. अमरनाथ यात्रा येत्या ३ जुलैपासून सुरु होत असून ती येत्या ९ ऑगस्टपर्यंत चालेल. नो - फ्लाईंग झोनचा नियम १ जुलैपासून १० ऑगस्टपर्यंत अमलात राहील. अमरनाथ यात्रेच्या सुरक्षेच्या दृष्टीनं यंदा विशेष व्यवस्था करण्यात आली असून निमलष्करी दलांच्या ५८० तुकड्या यात्रामार्गावर तैनात करण्यात येणार आहेत.

**<><><><>**

महाराष्ट्राच्या विविध भागात सरकार विशेष शॉपिंग मॉल उभारणार असून, या ठिकाणी ग्राहकांना शेतकऱ्यांकडून शेत मालाची थेट खरेदी करता येईल. महाराष्ट्राचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी ही माहिती दिली.

हे मॉल्स सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्वावर बांधले जातील, आणि त्यासाठी कृषी विभागाच्या मालकीची ३५ हजार एकर जमीन उपलब्ध केली जाईल, असं ते म्हणाले.

**<><><><>**

अहमदाबाद विमान अपघातातल्या १२५ मृतांची डीएनए चाचणीद्वारे ओळख पटवण्यात आली आहे. त्यापैकी ८३ मृतदेह मृतांच्या कुटुंबियांना सुपूर्द करण्यात आले आहेत, अशी माहिती गुजरातचे आरोग्यमंत्री ऋषिकेश पटेल यांनी दिली आहे. उर्वरित मृतदेह योग्य प्रक्रिया आणि ओळख पूर्ण झाल्यानंतर लवकरच संबंधित कुटुंबियांच्या ताब्यात दिले जातील,असंही पटेल यांनी सांगितलं.

दरम्यान, या विमानाचे कप्तान सुमीत सभरवाल यांच्या मृतदेहाचा डीएनए जुळल्यानंतर त्यांचं पार्थिव त्यांच्या कुटुंबियांकडे सोपवण्यात आलं. मुंबईत आज त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले.

गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्या पार्थिवावर काल राजकोट इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

**<><><><>**

संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेनं एक प्रस्ताव पारित करून दरवर्षी ४ डिसेंबर हा दिवस एकतर्फी प्रतिबंधात्मक उपाय लागू करण्याविरोधातला दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये सर्व देशांना आवाहन करण्यात आलं आहे की, त्यांनी आंतरराष्ट्रीय कायदा अथवा संयुक्त ठरावाचं उल्लंघन करणारे कोणतेही आर्थिक अथवा व्यापार विषयक उपाय लागू करू नयेत. कारण यामुळे विशेषतः विकसनशील देशांच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात अडथळा निर्माण होईल.

**<><><><>**

दक्षिण गुजरात आणि लगतचा प्रदेश, तसंच  पश्चिम बंगालच्या गंगेच्या खोऱ्यातल्या प्रदेशावर कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. त्याच्या प्रभावामुळे सौराष्ट्र, कच्छ, गुजरात तसंच पश्चिम बंगालचा गंगेच्या खोऱ्यातला प्रदेश, ओदिशा, बिहार आणि झारखंडमध्ये आज जोरदार ते अति जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

बिहार, झारखंड, मध्य प्रदेश, आणि राजस्थानमध्ये आज मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून,

कोकण, मध्य महाराष्ट्र, अरुणाचल प्रदेशचा काही भाग, कर्नाटकचा किनारपट्टी भाग, आणि ईशान्येकडच्या राज्यांमध्ये पुढले दोन दिवस जोरदार पाऊस पडेल असा अंदाज आहे.

**//<><><><>//**